ऐतवडे खुर्द ता. वाळवा, जि. सांगली येथील तलावाच्या कामांच्या खर्चास **प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**
शासन निर्णय क्रमांक: रासयो-२०१०/प्र.क्र.६४/ता.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २८ नोव्हेंबर, २०११.

वाचा:- जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचे पत्र क्र.नियोजन/का-१४-१(२)/पर्यटन/२१०/२०११, दिनांक १७.१.२०११

**प्रस्तावना:-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेतंर्गत योजनेत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सर्वसाधारणपणे खालील मुख्य कामांचा समावेश होतो.

१. तलावाच्या पाण्याचे प्रदुषण करणारे स्त्रोत निश्चित करून प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे.
२. तलावात साचलेला अनावश्यक घातक व ऑरगॅनीक गाळ काढणे.
३. तलावाची गुणवत्ता टिकविण्याकरीता, तलावाच्या पाणथळ क्षेत्राची धुप रोखण्यासाठी उपाययोजना करणे.
४. तलावातील अनावश्यक व उपद्रवी वनस्पती नष्ट करून त्यांची वाढ नियंत्रणात आणण्यासाठी उपायोजना करणे.
५. तलावांतर्गत जैविक प्रक्रीयेव्दारे तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारणे.
६. किनारा सौंदर्यीकरण, हरीत पट्टा विकसीत करणे, कुंपण घालणे, मनोरंजनासाठी बालोद्यान, नौकाविहार,कमी किमतीची स्वच्छतागृहे इत्यादी.
७. जनसहभाग व जनजागृतीसाठी कार्यक्रम तसेच प्रदुषण रोखण्यासाठी स्थानिक परीस्थितीनुसार करावयाच्या उपाययोजना.

या योजनेतंर्गत सन २०११-१२ या आर्थिक वर्षात ऐतवडे खुर्द ता. वाळवा, जि.सांगली येथील तलावाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनेअंतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेत जिल्हाधिकारी, सांगली यांनी सादर केलेल्या ऐतवडे खुर्द या तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धनासाठी सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सोबत जोडलेल्या **"प्रपत्र - अ"** मध्ये नमूद केलेली कामे पूर्ण करण्यासाठी एकूण **रू. १,३९,२२,२५३/- (अक्षरी रूपये एक कोटी एकोणचाळीस लाख बावीस हजार दोनशे त्रेपन्न फक्त)** इतक्या रकमेस सोबत जोडलेल्या **"प्रपत्र -ब"** मधील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. "प्रपत्र -अ" मधील नमूद कामांना प्रथमत: तांत्रिक मंजूरी प्राप्त करून घेण्यात यावी. योजनेच्या प्रत्येक टप्प्यात हाती घेण्यात येणा-या कामाचे मंजूर तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके, नकाशे, संकल्पचित्र ई. शासनाकडे काम सुरू करण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. शासनास उपरोक्त माहिती सादर केल्यानंतरच कामे सुरू करण्यात यावीत. हाती घेण्यात यावयाच्या ("प्रपत्र-अ" मधील नमूद कामे) कामांसंबंधित तलावाच्या सद्यस्थितीचे छायाचित्रे घेण्यात यावी, तसेच व्हीडीओ रेकॉर्डिंग करण्यात यावे. कामांच्या प्रगतीनुसार दर दोन महिन्यांनी याप्रकारे छायाचित्रण करण्यात यावे. योजनेतील कामे व त्यासाठीचा खर्च याबाबत मासिक आढावा घेऊन त्यानुसार बदल करण्याचे अधिकार शासनाकडे

राहतील. सदर मंजुर एकुण रकमेपैकी ९०% हिस्सा म्हणून राज्य शासन व १० % हिस्सा म्हणून ग्राम पंचायत ऐतवडे खुर्द निधी उपलब्ध करून देईल. सदर योजनेची वित्तीय आकृतीबंध पुढील प्रमाणे राहील:-

| अ.क्र. | हिस्सा | मंजुर निधी | अक्षरी मंजुर निधी |
|---|---|---|---|
| १ | ९०% राज्य हिस्सा | रू. १,२५,३०,०२७/- | रूपये एक कोटी पंचवीस लाख तीस हजार, सत्तावीस फक्त. |
| २ | १०% स्वराज्य संस्थेचा हिस्सा | रू.१३,९२,२२६/- | रूपये तेरा लाख ब्याण्णव हजार दोनशे सव्वीस फक्त |
| | **एकुण** | **रू. १,३९,२२,२५३/-** | **अक्षरी रूपये एक कोटी, एकोणचाळीस लाख, बावीस हजार, दोनशे त्रेपन्न फक्त** |

३. उपरोक्त कामासाठी होणारा खर्च मागणी क्र. यू-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण -०४-पदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३ वायु व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

४. योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी, सांगली यांची असेल.

५. उपरोक्त शासन निर्णय नियोजन विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र. ११०/१४६१ दिनांक २३ सप्टेंबर, २०११ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www. maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०११११२१३१३११५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दे.के.मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, सांगली.
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प), सांगली.
सरपंच, ग्राम पंचायत ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जिल्हा सांगली
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.

शासन निर्णय क्र.रासयो-२०१०/प्र.क्र.६४/ता.क.३, दि. २८ नोव्हेंबर, २०११ सोबतचे सहपत्र.

## प्रपत्र - अ

### CONSERVATION AND BEAUTIFICATION OF AITWADE (KH) IN TALUKA WALVA, DISTRICT SANGLI

| Sr. No. | Item | Description | Amount Rs |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Core scheme | | |
| 1 | | Strengthening of Talav edges | 55,52,315 |
| 2 | | Compound Wall for Talav Area | 22,25,684 |
| 3 | | RCC Gutter | 32,97,447 |
| 4 | Non core scheme | | |
| | | Conservation of Pump House | 2,28,869 |
| | | Land scaping and tree plantation | 13,52,281 |
| | | **Total** | **1,26,56,596** |
| | | **Add work contingency @ 4%** | **5,06,263** |
| | | **Add insurance @ 1%** | **1,26.565** |
| | | **Add electrification @ 5%** | **6,32,829** |
| | | **Grand Total** | **1,39,22,253** |
| **Rupees One Crore Thirty Nine Lacs Twenty Two Thousand Two Hundred Fifty Three Only** | | | |
| | | **90% share of GOM** | **1,25,30,028** |
| | | **10% share of Council** | **13,92,225** |

(दि.के.मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

D:\Chavan-PA\Aitwade Kurd-Sangli-2010-CR-64.doc

शासन निर्णय क्र.रासयो-२०१०/प्र.क्र.६४/ता.क.३, दि. २८ नोव्हेंबर, २०११ सोबतचे सहपत्र.

**प्रपत्र - ब**

**राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत ऐतवडे खुर्द, ता. वाळवा, जिल्हा सांगली येथील तलावाच्या कामांसाठीच्या अटी व शर्ती.**

१. लोकसहभाग व पर्यावरण जनजागृती या कार्यक्रमांविषयी प्रथमतः पर्यावरण विभागास सविस्तर कृती अहवाल सादर करण्यात यावा.

२. तलाव संवर्धन क्षेत्रात तज्ञ व कामाचा अनुभव असलेली तसेच "प्रपत्र-अ" नुसार मंजूर खर्चाच्या बाबी संबधीत तज्ञ व पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ असलेली संस्था / शासकीय प्राधिकरण / मंडळ यांची प्रथमतः प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था म्हणून ग्रामपंचायत, ऐतवडे खुर्द, ता. वाळवा, जिल्हा सांगली विहीत पध्दतीने नियूक्ती करावी. ही संस्था प्रपत्र-अ नुसार मंजूर खर्चाच्या बाबींचे स्थानिक डी.एस.आर.प्रमाणे खर्चाचे अंदाज, कामाचे आराखडे तयार करणे व तपासणे कामाची गुणवत्ता राखणे, सर्व कामे विहीत कालमर्यादेत पुर्ण करणे याबाबत वेळोवेळी समन्वय करेल. ग्रामपंचायतीने तांत्रिक मनुष्यबळ प्रकल्पासाठी तयार होण्यासाठी या संस्थेचा उपयोग करावा.

३. कामे विहीत कालावधीत पुर्ण करण्याची व कामाची गुणवत्ता राखण्याची संपुर्ण जबाबदारी ही जिल्हाधिकारी, सांगली यांची असेल.

४. प्रकल्पाची यथायोग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून प्रकल्प सनियंत्रण समितीची जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात यावी. या समितीत संबधित अधिकारी, कर्मचारी, उपरोक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी यांच्यासह जिल्हाधिकारी, सांगली यांना आवश्यक वाटतील त्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा. एक प्रतिनिधी पर्यावरण विषयक तज्ञ असावा, जेणेकरून सदर प्रतिनिधीकडून प्रकल्प अंमलबजावणीसाठी पर्यावरणविषयक योग्य मार्गदर्शन मिळेल. ही समिती प्रकल्पांतर्गत होत असलेल्या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करेल व कामांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवेल. सदर समितीची आढावा बैठक दर महिन्याला आयोजित करण्यात यावी.

५. प्रकल्प पूर्ण झाल्यावरही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या मदतीशिवाय तलावाचे संवर्धन होणे गरजेचे असल्याने योजनेची कामे पूर्ण झाल्यावरही ही समिती बैठका आयोजित करेल. ही समिती भौतिक बाबींची देखभाल, प्रकल्पांपासून मिळाणारे उत्पन्न, प्रकल्प संवर्धनासाठी उपाययोजना व खर्च याबाबत आढावा घेत राहील.

६. तलावाच्या पाण्याची गुणवत्ता चालू महिन्यापासून पुढे प्रत्येक महिन्याला तपासण्यात यावी. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रयोगशाळेची / संस्थेची / मंडळाची नियुक्ती करण्यात यावी. दर महिन्याचा पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल सदर संस्था प्रकल्प सनियंत्रण समितीस व पर्यावरण विभागास सादर करेल.

७. उपरोक्त मुद्दयानुसार केलेल्या कार्यवाही प्रमाणे जिल्हाधिकारी, सांगली हे शासनास दर तीन महिन्याला खालील अहवाल सादर करतील

i ) मंजूर कामांचा भौतिक प्रगती अहवाल
ii) पाण्याच्या गुणवत्ता अहवालाच्या प्रती
iii) प्रकल्प सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त
iv ) खर्चाचे प्रत्येक तिमाहिचे उपयोगिता प्रमाणपत्र.

८. सदर अहवाल सादर केल्याशिवाय कामाच्या पुढील टप्प्यातील निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या १० तारखेपर्यंत पर्यावरण विभागास सादर करावे. उपरोक्त मंजुर योजनेसाठी निधी उपलब्धतेनुसार अनुदान मुक्त करण्यात येईल.

९. योजनेतर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे व विहीत कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. हा निधी इतर दुस-या कोणत्याही कामासाठी वा ग्राम पंचायतीच्या कामासाठी वापरता येणार नाही किंवा वळता करता येणार नाही. विशिष्ट कामासाठी मान्य केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबधित महानगरपालिकेची असेल.

१०. या योजनेतर्गत प्राप्त होणारा निधी हा राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्या अंतर्गत जमा करावा व बँकेत ठेवलेल्या निधीवर मिळणारे व्याज याच निधीत जमा करावे. या निधीच्या उपयोगितेवर नियंत्रण राहण्यासाठी खात्याचे संचालन जिल्हाधिकारी, सांगली यांच्याद्वारे करण्यात यावे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतेवेळी बँकेतील या खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणा-या पासबुकाची साक्षांकित प्रत सोबत जोडण्यात यावी.

११. योजना पूर्ण झाल्यावर या योजनेतर्गत निर्माण झालेल्या मालमत्तेपासून किंवा सोयीसुविधांपासून मिळणारे उत्पन्न हे या योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यातच जमा करण्यात यावे. या उत्पन्नातून तलाव संवर्धनासाठी अतिरिक्त कामे राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या अनुमतीने हाती घेता येतील. मात्र तलावाच्या संवर्धनाच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी हा महसूली निधी वापरता येणार नाही.

१२. ही कामे शासन आदेशाच्या दिनांकापासुन २४ महीन्यात किंवा तत्पुर्वी पुर्ण करावयाची आहेत.

१३. मंजूर बाबीतील खर्चामध्ये बचत झाल्यास बचत झालेला निधी योजनेतीलच दुस-या उपांगासाठी राज्य शासनाच्या पर्यावण विभागाच्या परवानगीने तो वापरता येईल.

१४. राज्य सरोवर संवर्धन योजनेतर्गत निर्माण केलेल्या यंत्रणेच्या देखभाल व दुरूस्तीचा खर्च योजना कार्यान्वयीत झाल्यानंतर संबंधीत ग्रामपंचायतीने स्वत:च्या निधीतून भागवावयाचा आहे.

१५. योजनेतर्गत खर्च करण्यात येणा-या रकमेचे लेखे प्रचलित लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावेत व त्याचे लेखापरिक्षण स्थानिक निधी व लेखापाल यांच्याद्वारे करण्यात यावे व त्याचा अहवाल पर्यावरण विभागास पाठविण्यात यावा.

१६. तलावाच्या कामांच्या प्रगतीच्या अहवालाची तसेच खर्चाच्या विवरणपत्राची पर्यावरण विभागाच्या सक्षम अधिका-याकडून तपासणी करण्यात येईल व तपासणीच्या वेळी ग्रामपंचायतीने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

१७. संबंधीत ग्रामपंचायतीच्या हद्दीतील हॉटेलमधून / लोकवस्तीतून / वाणिज्यिक आस्थापनेतून निघणारे सांडपाणी तलावात जाणार नाही याची जबाबदारी संबंधीत ग्रामपंचायतीवर असेल.

१८. योजनेवरील कामासाठी मान्यता प्राप्त झालेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च झालेली रक्कम शासनाकडून उपलब्ध होणार नाही. या कामासाठी शासनाने अदा केलेली रक्कम जर त्या कामावर घालून दिलेल्या विविक्षित वेळेमध्ये खर्च होऊ शकत नसेल तर त्यास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल..

१९. योजनेवरील कामासाठी अदा केलेली रक्कम योग्यरितीने वापरली जात नाही किंवा कामाची योग्य ती प्रगती होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आल्यास शासन कोणत्याही क्षणी अशा कामांची प्रशासकीय मान्यता रद्दबातल करू शकेल.

२०. राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परवानगी शिवाय तलावात बोटींगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच यांत्रिक बोटींचा वापर तलावात कुठल्याही प्रयोजनासाठी अनुज्ञेय असणार नाही. फक्त पॅडल बोटचा वापर अनुज्ञेय असेल.

२१. तलावात मत्स्यमारी शक्यतो करण्यात येवू नये. मत्स्यमारी करावयाची झाल्यास फक्त मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यासाठी परवानगी देण्यात यावी. अशावेळी १० इंच व त्यापेक्षा लहान आकाराच्या माशांना पकडण्याची मुभा देण्यात येवू नये. स्थानिक परिस्थितीनूसार याबाबत प्रकल्प सनियंत्रण समिती वेळोवेळी निर्णय घेईल.

२२. योजनेवरील कामांसाठी राज्य शासनाच्या अनुदाना व्यतिरीक्त शासनाकडून, वित्तीय संस्थाकडून वा आणखी कोणत्याही संस्थाकडून प्राप्त निधी या योजने अंतर्गत खर्च झाल्याचे दर्शविण्यात येवू नये. (No Overlaping of schems)

२३. योजनेचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्यासाठी भेट देणा-या राज्य शासनाच्या अधिका-यांस आवश्यक त्या सर्व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असेल.

२४. योजनेतंर्गत शासनाच्या अनुदानातून तयार केलेली मालमत्ता, ज्या कामासाठी निर्माण केली आहे. त्याच कामासाठी वापरणे आवश्यक आहे व त्यासाठी ही मालमत्ता अभिलेखित करणे आवश्यक आहे.

२५. योजनेतंर्गत करण्यात येणा-या निरनिराळया कामांचे व समन्वयाचे काम राज्य स्तरावरील सनियंत्रण समितीव्दारे करण्यात येते. या समितीने कामाबाबत वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

२६. योजनेतंर्गत ग्रामपंचायतीच्या होणा-या आस्थापनेवरील व लागणा-या मनुष्यबळावरील खर्च संबंधीत ग्रामपंचायतीद्वारे करण्यात येईल. यासाठी या विभागाकडून अनुदान देण्यात येणार नाही.

२७. योजनेतंर्गत तलावातून काढण्यात येणा-या गाळाचे अभिलेख व छायाचित्रासह पुरावे ग्रामपंचायतीने जतन करावेत. तसेच गाळाच्या विल्हेवाटीची अभिलेखामध्ये नोंद करून ठेवावी.

२८. राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तीचे पालन करणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक राहील.

२९. योजनेतंर्गत किती लोकांना रोजगार उपलब्ध झाला याची नोंद ठेवावी.

३०. योजना कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असल्याने योजने करीता कोणतेही एस्कलेशन चार्जेस अनुज्ञेय नाहीत.

३१. योजनेतंर्गत मंजूर कामांच्या निविदा हया प्रकल्पातंर्गत मंजूर किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या स्विकारण्यात येऊ नयेत.

३२. कॉन्ट्रक्टरने विहीत वेळेत काम पुर्ण न केल्यास त्यांच्यावर दंडाची तरतूद ठेवण्यात यावी.

३३. योजनेतंर्गत झालेल्या सर्व खर्चाचा ताळमेळ वेळोवेळी अधिदान व लेखाअधिकारी कार्यालय, मुंबई व तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयाशी घालण्याची जबाबदारी संबधीत जिल्हाधिकारी कार्यालयाची असेल.

३४. योजना पुर्ण झाल्यावर भविष्यात तलावाच्या उपयोगाबाबत व वापराबाबत किंवा तलावासंदर्भात कोणतीही नविन कामे हाती घ्यावयाची झाल्यास त्यास प्रथम राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यात यावी.

(दे.कं.मानकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

ऐतवडे खुर्द ता. वाळवा, जि. सांगली येथील तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांतील कामासाठी निधी मुक्त करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**
शासन निर्णय क्रमांक: रासयो-२०१०/प्र.क्र.६४/ता.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १३ डिसेंबर, २०११

वाचा:- विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक २८ नोव्हेंबर, २०११.

**प्रस्तावना:-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेतंर्गत येजनेत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सन २०११-१२ या वर्षात जिल्हाधिकारी, सांगली यांचेमार्फत प्राप्त तलावाच्या प्रस्तावास संदर्भाधीन दिनांक २८ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने ऐतवडे खुर्द, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी निधी मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनांतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत ऐतवडे खुर्द येथील तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी एकुण मंजूर रु.१,३९,२२,२५३/- पैकी अनुज्ञेय राज्य हिस्स्यांचे ९० टक्के म्हणजेच रुपये १,२५,३०,०२८/- पैकी **पहिला हप्ता म्हणून रुपये ६३.०० लाख (अक्षरी रुपये त्रेसष्ट लाख फक्त)** इतकी रक्कम या शासन निर्णयाद्वारे जिल्हाधिकारी, सांगली यांना वितरीत / मुक्त करण्यास संदर्भाधीन दिनांक २८ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. **यासाठी जिल्हाधिकारी, सांगली (Collector, Sangli) यांचे नावे रुपये ६३.०० लाख (अक्षरी रुपये त्रेसष्ट लाख फक्त) एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.**

३. जिल्हाधिकारी, सांगली यांना अदा करावयाचे रु. ६३.०० लाख अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून **जिल्हाधिकारी, सांगली** यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.दे.के. मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. श्या . ना. धकाते, सह सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **जिल्हाधिकारी , सांगली यांना रु. ६३.०० लाख (अक्षरी रुपये त्रेसष्ट लाख फक्त)** अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर होणारा खर्च मागणी क्र.यु-४,३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण-०४-प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण (१०३) वायू व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना-(३४३५ ०१ ८२),३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावी व ती सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावी.

D:\Chavan-PA\Aitwade Kurd-Sangli-2010-CR-64.doc

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौ.संदर्भ क्रमांक ३८०/व्यय-१६, दिनांक १४.११.२०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in ) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१११२१३१३१५४७००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि. के. मानकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई,
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई,
जिल्हाधिकारी, सांगली,
सरपंच, ग्राम पंचायत ऐतवडे खुर्द, ता. वाळवा, जिल्हा सांगली,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) सांगली,
मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी /लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ , मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, व्यय-१६/अर्थसंकल्प-७, मंत्रालय, मुंबई,
नियोजन विभाग, कार्यासन-१४६१, मंत्रालय, मुंबई,
रोख शाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवडनस्ती.